प्रेसनोट                    दिनांक २०/०८/२०२४

श्री.श्रीहरी अर्जुनराव खरात, वय–३६ वर्षे, ग्रामसेवक कुरूळ ग्रामपंचायत, व श्री.सुजित शाम पाटील उर्फ पिंटया, वय– ३९ वर्षे, लिपिक, कुरूळ ग्रामपंचायत, ता.अलिबाग यांस ५०,०००/– रूपये लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग रायगड यांनी घेतले ताब्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंध विभाग/घटक | रायगड. |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | पोलीस ठाणे अलिबाग. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.श्रीहरी अर्जुनराव खरात, वय–३६ वर्षे, ग्रामसेवक कुरूळ ग्रामपंचायत, (वर्ग–३)<br>२) श्री.सुजित शाम पाटील उर्फ पिंटया, वय– ३९ वर्षे, लिपिक, कुरूळ ग्रामपंचायत, (वर्ग–४) ता.अलिबाग |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये, |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये |
| थोडक्यात हकिगत | यांतील तक्रारदार यांचे मौजे कुरूळ गट क्रमांक ३४/४ या जागेवर स्वतंत्र घर बांधलेले आहे. सदर घरास घरपट्टी आकारून असेसमेंट उतारा मिळणेकरीता श्री.श्रीहरी खरात, ग्रामसेवक ग्रामपंचायत कुरूळ हे ५०,०००/– रूप्ये रूपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणीच्या वेळी दिनांक १६/०८/२०२४ रोजी १५.३५ ते १६.४५ वाजण्याचे दरम्यान तक्रारदार यांचेकडे ग्रामपंचायत कार्यालय, कुरूळ येथे ५०,०००/–रूपये लाचेची मागणी करून, लाचेची रक्कम श्री.सुजित शाम पाटील उर्फ पिंटया लिपिक, कुरूळ ग्रामपंचायत यांचेकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे दिनांक २०/०८/२०२४ रोजी कुरूळ ग्रामंपचायत कार्यालयात सापळा आयोजित केला असता ग्रामसेवक श्री.खरात यांनी तक्रारदार यांचेकडे पुर्वी मागणी केल्याप्रमाणे रूपये ५०,०००/– लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लिपिक श्री. सुजित शाम पाटील उर्फ पिंटया यांचेकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे श्री.सुजित शाम पाटील उर्फ पिंटया यांना तक्रारदार यांचेकडून कुरूळ ग्रामपंचायत कार्यालय आवारात ५०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारताना पंचासमक्ष १३.०५ वाजता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |
| मार्गदर्शक अधिकारी | १) मा.श्री.सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे<br>२) मा.श्री.महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे |

**लाचलूचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की,भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.
संकेतस्थळ :– **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई–मेल :– **spacbthane@mahapolice.gov.in**
ऑनलाईनतक्रारअॅप्लीकेशन :– **acbmaharashtra.net**
टोलफ्रीक्रमांक :– १०६४
दुरध्वनिक्रमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सअॅपक्रमांक :– ९९३०९९७७००
अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२१४१ – २२२३३१
टोल फ्री क्रमांक :– १०६४
मोबाईलक्र. :– ९८७०३३२२९१ (शशीकांत पाडावे ),
ईमेलआयडी :–**dyspacbraigad@gmail.com**

(शशीकांत पाडावे)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग